देशदूत
www.deshdoot.com
/deshdoot /deshdoot /deshdoot Daily Newsgram
नाशिक । सोमवार, दि. १६ जून २०२५
संमिश्र

कच टाकून खड्डे बुजवल्याने अपघाताचा धोका

जीव गेल्यावर मनपाला जाग येईल का? नागरिकांचा सवाल

नवीन नाशिक । प्रतिनिधी

उशिराने होईना महापालिकेला शहाणपण सुचले आणि फडोळ मळा ते अंबड गावदरम्यानच्या रस्त्यावरील खड्डे बुजवण्यास सुरुवात करण्यात आली. मात्र या खड्ड्यांमध्ये कच टाकल्याने दुचाकी वाहने घसरून अपघात होत असल्याने वाहन चालकांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे.

फडोळ मळा ते अंबड गाव दरम्यानचा परिसर नव्याने विकसित झालेला परिसर म्हणून ओळखला जातो. या ठिकाणी कामगार ते कंपनी मालक, व्यावसायिक असे लोक वास्तव्यास आहेत. असे असताना येथील मुख्य रस्त्यावर गेल्या कित्येक महिन्यांपासून खड्डे पडले होते. भारतीय जनता पार्टी चिटणीस शरद फडोळ, तानाजी फडोळ, उत्तम मटाले यांच्यासह ग्रामस्थांनी महापालिका आयुक्तांची भेट घेऊन सदरह् रस्ते खड्डेमुक्त करण्याची मागणी केली होती. त्यानंतर बऱ्याच अवधीनंतर महापालिकेने येथील खड्डे बुजवण्यास सुरुवात केली, मात्र ते काम करत असताना आधी मोठे दगड त्या ठिकाणी टाकून त्यावरून रोलर फिरवून तेथे शिंपडल्यासारखे डांबर टाकून त्यावर कच (बारीक खडी) टाकली. यामुळे खड्डे बुजवले तर गेले मात्र या कचवरून दुचाकी चालवत असताना अपघात दररोजच घडायला लागले आहेत. महापालिकेला जर खड्डेच बुजवायचे होते तर अशा विचित्र पद्धतीने त्यांनी खड्डे का बुजवले, असा प्रश्न आता संतप्त नागरिक करत आहेत.

याठिकाणी खड्डे बुजविण्यासाठी जी पद्धत वापरण्यात आली आहे, यावरून महापालिका अधिकारी व ठेकेदार यांच्यात लागेबांधे असल्याचा संशय स्थानिक नागरिकांनी व्यक्त केला आहे. सदरहू रस्ता प्रश्नी येथील नागरिक आंदोलनाच्या पवित्र्यात आहेत.

सदरहू रस्ता हा नवीन करण्याची आमची मागणी होती. मात्र महापालिकेने खड्डे बुजवायला सुरुवात केली. असे करत असताना खड्ड्यांमध्ये कच टाकून महापालिका आता नागरिकांच्या जीवाशी खेळणार आहे का, यावर तत्काळ उपाययोजना न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल.

■ शरद फडोळ, चिटणीस, भाजप नाशिक

सदरहू ठिकाणी कच देखील टाकण्यात आली आहे. सध्या पावसाळा सुरू झाल्याने यावर डांबरीकरण करणे शक्य नाही. त्यामुळे पावसाळ्यानंतरच येथे डांबरीकरण होईल.

■ हेमचंद्र नांदुर्डीकर, उपअभियंता, बांधकाम विभाग, नवीन नाशिक

राज्यस्तरीय जाहिरात एजन्सी फेडरेशन अध्यक्षपदी रवी पवार

पुणे । प्रतिनिधी

महाराष्ट्रातील ॲडव्हर्टायझिंग एजन्सीजची राज्यस्तरीय शिखर संस्था असलेल्या फेम (फेडरेशन ऑफ ॲडव्हर्टायझिंग ॲंड मार्केटिंग एंटरप्रेनियर्स)च्या अध्यक्षपदी नाशिकचे रवी पवार यांची निवड करण्यात आली आहे. फेमची सर्वसाधारण सभा शनिवारी (दि.१४) संस्थापक अध्यक्ष अमरदीप पाटील यांच्या अध्यक्षतेखाली व माजी अध्यक्ष मोतीराम पिंगळे व मावळते अध्यक्ष महेश कराडकर, उपाध्यक्ष प्रफुल्ल मुथा यांच्या प्रमुख उपस्थितीत पुण्यात पार पडली. यावेळी सन २०२५-२७ साठी फेमच्या नूतन कार्यकारिणीची बिनविरोध निवड करण्यात आली. उपाध्यक्ष प्रकाश शहा, सचिव रामदेव व्यास, सहसचिव अजिंक्य उजळंबकर, खजानीस कौस्तुभ नाबर, तसेच पुढील २०२७-२९ या कालावधीसाठी अध्यक्ष (इलेक्ट) म्हणून संदीप झवेरी यांची निवड झाली आहे. सुरुवातीला मावळते अध्यक्ष महेश कराडकर यांनी कार्य अहवाल मांडला. कौस्तुभ नाबर यांनी मागील सभेचे इतिवृत्त व आर्थिक अहवाल सादर केला त्यास मंजुरी देण्यात आली. नूतन अध्यक्ष रवी पवार यांनी जाहिरात एजन्सीच्या उन्नतीसाठी येणाऱ्या काळात विविध सेमिनार तसेच प्रशिक्षण शिबिरे घेण्यात येणार असल्याचे सांगितले. तसेच अद्याप ज्या जिल्ह्यांमध्ये जाहिरात एजन्सिजच्या जिल्हा संघटना कार्यरत नाहीत तेथे जिल्हा संघटना सुरू करण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील असे पवार म्हणाले. जाहिरात एजन्सी समोरील विविध समस्या व आव्हानांची यावेळी सविस्तर चर्चा करण्यात आली. संदीप झवेरी यांनी सूत्रसंचालन केले. सचिव रामदेव व्यास यांनी सर्व उपस्थितीतांचे आभार मानले.यावेळी राज्यातील सर्व एजन्सीजचे संचालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यकारिणी सदस्य संजय साताळकर, सुनील बासरानी, दीपक जगताप, संतोष उदगिरी, राहुल देशपांडे, नरेंद्र चौधरी, अरुण मलिक, राजेंद्र म्याना, सुनील बुधवानी, राजेश वाळवेकर, परेश पेडणेकर

बावनकशी सोन्यासारखी साहित्यनिर्मिती

सुनीत पोतनीस यांच्या पुस्तक प्रकाशनवेळी डॉ. बोरसे यांचे प्रतिपादन

नाशिक । प्रतिनिधी

सुनीत पोतनीस यांनी उशिराने लेखनाला सुरुवात केली, पण बावनकशी सोन्यासारखी साहित्याची निर्मिती केल्याचे प्रतिपादन राजहंस प्रकाशनाचे संपादक डॉ. सदानंद बोरसे यांनी केले.

राजहंस प्रकाशन प्रकाशित आणि सुनीत पोतनीस लिखित शोध बदलत्या पृथ्वीचा या पुस्तकाचे प्रकाशन रविवारी (दि.१५) गिरीश टकले व राजहंस प्रकाशनाचे संपादक डॉ. सदानंद बोरसे यांच्या हस्ते शंकराचार्य न्यास कूर्तकोटी सभागृह येथे संपन्न झाला.

बोरसे पुढे म्हणाले, गांवकरी हे गुरुकुल होत यातून अनेक पत्रकार, तंत्रज्ञ बाहेर पडले. गांवकरीच्या गुरूकुलाचे प्रमुख दादासाहेब पोतनीस होते. त्यांच्या सानिध्यात अनेक चांगले लोक तयार झाले. भूगोल समजल्याशिवाय इतिहास समजत नाही. शास्त्रीय विषयावरच लेखन अवघड अन् बोजड ठरण्याची शक्यता असते. मात्र दंत कथाची चांगल्या रितीने जोड देऊन पुस्तक वाचनीय केले आहे.

यावेळी अनंत येवलेकर व वंदना अत्रे यांनी सुनीत पोतनीस यांची छोटेखानी मुलाखत घेतली. या मुलाखतीत पोतनीस यांनी पुस्तक लिहिण्याचा मागचा प्रवास उलगडतानाच पृथ्वीच्या निर्मितीवेळी निर्मितीनंतर भूगर्भात झालेले प्रमुख बदल आणि त्या संदर्भातील माहिती उलगडून सांगितली.

सुनीत पोतनीस म्हणाले, बखर संस्थांची व जे आले ते रमले हे दोन्ही पुस्तकांच्या निर्मिती आधी दैनिकात सदर सुरू होते, नंतर त्यांचे पुस्तकात रूपांतर करण्यात आले. शोध बदलत्या पृथ्वीचा हा निराळा विषय आहे. कन्याकुमारीत विवेकानंद स्मारकाच्या तिथे असलेला खडक व बंगलोरला लालबागच्या मागे असलेल्या टेकड्या याविषयी अद्भूत माहिती मिळाली. पृथ्वीच्या निर्मितीनंतर साडेचार वर्षांपूवी बेन्झिया हा एकच खंड होता. पृथ्वीच्या निर्मितीमध्ये पहिल्यांदाच जे खडक निर्माण झाले ती पहिली टेकडी लालबागची आहे. माहिती वाचत गेलो शोधत गेलो. भूगर्भ शास्त्राची माहिती मिळाली. म्हणून पुस्तक काढू असे ठरवले.

डॉ.सदानंद बोरसे मनोगतात म्हणाले, चिकित्सक व वैज्ञानिक पद्धतीने ४५०० हजार वर्षांनतर पृथ्वीत झालेल्या बदलांचा धांडोळा घेतला आहे. पोतनीस यांनी पुस्तकात सहज, सुंदर, अंत्यत सुबोध रसाळ शैलीत पुस्तक लिहिले आहे.

कार्यक्रमाच्या सुरवातीला लेखक सुनीत पोतनीस यांच्या कन्या प्राची पोतनीस देवस्थळी यांनी मनोगत व्यक्त केले. रवींद्र देवरे व विकास गोगटे यांनी मान्यवरांचे स्वागत केले. सूत्रसंचालन वंदना अत्रे यांनी तर आभार अनंत येवलेकर यांनी मानले.

ऋतुरंगमध्ये बरसला गाण्यांचा पाऊस

नाशिकरोड । प्रतिनिधी

येथील ऋतुरंग संस्थेतर्फे ऋतुरंग भवन येथे पाऊस गाणी, कविता व गप्पांच्या कार्यक्रम सादर करण्यात आला. नाशिकरोडच्या रसिकांनी या कार्यक्रमाला मोठ्या प्रमाणात हजेरी लावली.

या कार्यक्रमाची संकल्पना ऋतुरंगचे उपाध्यक्ष संतोष जोशी यांची होती. विविध कविता, उर्दू शायरी यांच्या माध्यमातून कार्यक्रमाचे निवेदन ऋतुरंगच्या सचिव तन्वी अमित यांनी केले.

बिझनेस बँक प्रायोजित या कार्यक्रमात निपेश सचदे, मीता सूचक, राजेश कुमार, कुलदीप सिंह, सत्यभामा वाळवंटे, डॉ. राजश्री गवारे, स्वप्ना गोखले, निपेष सचदे, निखिल जोशी, गॉडविन लुईस, नेहा आहेर, नेहा वालेचा यांनी गीते सादर केली. कार्यक्रमाचे तांत्रिक सहाय्य गिरीश वागळे यांनी केले.

नव्या जुन्या हिंदी मराठी गाण्यांचा तसेच शास्त्रीय संगीतापासून बालगीतांपर्यंत गीतांचा सहभाग असलेला व विविध कवींच्या कविता, उर्दू शायरी असा चौफेर समृद्ध कार्यक्रम रसिकांना मनापासून भावला. बिझनेस बँकेचे अध्यक्ष वसंत नगरकर, विजय चोरडिया, ऋतुरंगचे अध्यक्ष विजय संकलेचा, उपाध्यक्ष प्रकाश पाटील, सदस्य राजेंद्र शिरसाठ, भागवत माळी, रवी पारुंडेकर, विवेक बापट, प्रभाष जोशी, सुभाष पाटील, रवी अमृतकर आदी उपस्थित होते.

गुणवंतांचा गौरव

पंचवटी । म्हसरूळ-मेरी परिसर सांस्कृतिक शैक्षणिक कला व क्रीडा मंडळ व श्री गणेश अभ्यासिका यांच्या वतीने दहावी व बारावी परीक्षेत यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा गौरव सोहळा कृष्णा माधव मंगल कार्यालयात उत्साहात पार पडला.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांना ट्रॉफी देऊन सत्कार करण्यात आला. प्रमुख पाहुणे म्हणून आमदार राहुल ढिकले व भाजप जिल्हाध्यक्ष सुनील केदार उपस्थित होते. आमदार ढिकले यांनी विद्यार्थ्यांना संकटावर मात करण्याचा संदेश दिला.

पान १ वरून ....

पूल कोसळून चार पर्यटकांचा मृत्यू

पर्यटक या पुलावर होते. या दुर्घटनेमधून एकूण ३८ व्यक्तींचा बचाव करण्यात आला आहे. त्यापैकी १८ व्यक्ती जखमी झाले असून त्यांना रुग्णवाहिकेच्या मदतीने सोमाटणे फाटा, ता. मावळ येथील १) पवना रुग्णालय, २) मायमर हॉस्पिटल, ३) अथर्व हॉस्पिटल आदी रुग्णालयांत उपचाराकरता दाखल करण्यात आले आहे. उपचारादरम्यान ४ व्यक्तींचा मृत्यू झाला.

राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाची २ पथक, आपदा मित्र, पुणे आणि पिंपरी चिंचवड आणि पीएमआरडीए अग्निशमन दल, लोणावळ्यातील शिवदुर्ग रेस्क्यू पथक व स्थानिक मदत बचाव संस्था इत्यादी घटनास्थळी दाखल झाल्या असून, मदतकार्य सुरू आहे.

अनेक नेत्यांची घटनास्थळी धाव

या दुर्घटनेची माहिती समजताच मदत व पुनर्वसनमंत्री गिरीश महाजन, मावळ तालुक्मयाचे आमदार सुनील शेळके, माजी राज्यमंत्री बाळा भेगडे, भाजपाचे नेते रवींद्र भेगडे, खासदार सुप्रिया सुळे, आमदार रोहित पवार, रघुवीर शेलार यांच्यासह अनेक लोकप्रतिनिधी व अधिकाऱ्यांनी घटनास्थळी दाखल घेतली व मदत व बचाव कार्य सुरू करण्यात आले. दुर्घटना घडल्यामुळे या ठिकाणी मोठ्या प्रमाणात पर्यटक व परिसरातील नागरिकदेखील दाखल झाले. त्यामुळे परिसरात मोठी गर्दी झाली होती. परिणामी मदत कार्यास काहीसा अडथळा निर्माण होत होता. त्यातच पावसाच्या सरीही सुरू होत्या. त्यानंतर अंधारही पडला. मात्र, बचाव कार्य सुरूच ठेवण्यात आले होते.

केदारनाथजवळ हेलिकॉप्टर अपघात

मुख्यमंत्र्यांना दु:ख उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनी हेलिकॉप्टर अपघाताबद्दल तीव्र दु:ख व्यक्त केले आहे. रुद्रप्रयागमध्ये हेलिकॉप्टर दुर्घटनाग्रस्त झाल्याची अत्यंत दु:खद बातमी मिळाली. एसडीआरएफ, स्थानिक प्रशासन, इतर बचाव पथके मदत आणि बचाव कार्यात गुंतले आहेत, असे पुष्कर सिंह धामी म्हणाले.

महिनाभरात चार अपघात

८ मे – उत्तरकाशी अपघात

गंगणी (उत्तरकाशी) येथे भागीरथी नदीजवळ हेलिकॉप्टर कोसळले. पायलटसह ६ जणांचा मृत्यू. मृतांत बरेलीच्या आई-मुलीचा समावेश. हेलिकॉप्टर गंगोत्री धामकडे जात होते.

१७ मे – एअर ॲम्ब्युलन्स अपघात

रुग्ण घेण्यासाठी जाणारे हेलिकॉप्टर लँडिंगदरम्यान कोसळले. पायलट, डॉक्टर आणि नर्स सुरक्षित. टेल बूम तुटल्याने अपघात.

७ जून – आपत्कालीन लँडिंग

रुद्रप्रयागमध्ये तांत्रिक बिघाडामुळे हेलिकॉप्टरची रस्त्यावर इमरजन्सी लँडिंग. मागचा भाग कारवर पडला. पायलटला किरकोळ इजा, प्रवासी सुरक्षित.

१५ जून – केदारनाथ अपघात

गुप्तकाशीहून केदारनाथकडे जाणारे हेलिकॉप्टर कोसळले. ७ जणांचा मृत्यू. मृतांत यवतमाळच्या जयस्वाल कुटुंबीयांचा समावेश.

रुपाणी यांचे डीएनए जुळले

अहमदाबाद विमान अपघातात मृत्युमुखी पडलेले गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपाणी यांचे डीएनए जुळले आहेत. त्यांचा मृतदेह कुटुंबियांकडे सोपवण्यात येणार आहे. राजकोटमध्ये त्यांच्यावर अंत्यसंस्कार केले जातील.

शंभर शवपेट्या दाखल

मृतदेह ठेवण्यासाठी १७० शवपेट्या तयार करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्यापैकी १०० शवपेट्या वडोदराहून अहमदाबादला आणण्यात आल्या आहेत. उर्वरित शवपेट्या बनवण्याचे काम सुरू आहे.

तुर्कीने दावा फेटाळला

तुर्कीच्या माहिती विभागाने एअर इंडियाच्या बोईंग ७८७-८ विमानाची देखभाल तुर्की टेक्निक कंपनीने केल्याचा दावा 'एक्स'वरील पोस्टमध्ये फेटाळून लावला आहे. असा दावा करणे म्हणजे जनतेची दिशाभूल करण्याचा आणि भारत-तुर्की संबंधांवर परिणाम करण्याचा प्रयत्न आहे. एअर इंडिया आणि तुर्की टेक्निक यांच्यातील करार फक्त बी-७७७ विमानांच्या देखभालीसाठी आहे; बोईंग ७८७-८ साठी नाही. तुर्की टेक्निकने कधीही अपघातग्रस्त विमानाच्या देखभालीचे काम केलेले नाही, असे 'एक्स'वरील पोस्टमध्ये म्हटले आहे.

डीएनए चाचणीतून ३२ मृतांची ओळख

अहमदाबादला पोहोचू शकतात. अनेक मृतदेह ओळखण्यापलीकडे जळाले होते. त्यामुळे बळींची ओळख पटवण्यासाठी अधिकारी डीएनए चाचण्या करीत आहेत. आतापर्यंत ३२ डीएनए नमुने जुळले आहेत. हे मृतदेह उदयपूर, वडोदरा, खेडा, मेहसाणा, अरवल्ली, अहमदाबाद आणि बोटाड जिल्ह्यातील होते. अपघातातील मृतांच्या कुटुंबियांशी समन्वय साधण्यासाठी २३० पथके तयार करण्यात आली आहेत. लंडनला जाणाऱ्या विमानात २४२ प्रवाशांपैकी २४१ जणांचा आणि क्रू मेंबर्सचा समावेश होता. एक प्रवासी आश्चर्यकारकपणे बचावला.

शब्दकोडे : २७८

१		■	२	३			४	■	५	६		७	८	■
	■	९			■	■	१०	११			■	१२		
१३				■	१४	१५	■	१६		■	१७	■		■
	■	१८		१९			■	२०				■	२१	
■	२२		■		■	२३	२४		■	■	२५			■
२६		■	२७		२८	■		■	२९			■	■	३०
३१		३२				■	३३	३४		■	३५	३६	३७	
■	३८			■	३९		■	४०		४१	■	४२		■
४३		■	■	४४		■	४५		■	४६		■	४७	४८
	■	४९	५०		■	५१		■	५२		■	५३		
५४	५५	■	५६		५७	■	५८	५९		■	६०			■
■	६१	६२	■	६३		■	६४		■	६५			■	६६
६७	■	६८		■	६९	७०		■	७१		■	७२	७३	
	■		■	७४	■		■	७५			■	■		■
■	७६								■	७७				

आडवे शब्द : १) कायदेशीर. २) कमीत कमी. ५) टणक, कडक. ९) विवाह. १०) सुळे. १२) चिंता. १३) अनुवाद. १४) लुकडा, किडकिडीत. १६) उबदार पांघरुण (इं.) १८) दागदागिने. २०) वरपांगी, दिखाऊ. २१) फुलाची प्रथमावस्था. २२) चिखल. २३) ललाट. २५) हत्ती. २६) पुष्परस. २७) गावाखालची जमीन. २९) घर (हिं.). ३१) चकचकीत. ३३) दृष्टी. ३५) रविंद्रनाथ टागोर यांचा सुप्रसिद्ध काव्य संग्रह. ३८) दगड-धोंड्याच्या कामात वाकबगार असलेली जमात. ३९) सेवक, गुलाम. ४०) मध्यस्थ. ४२) कलंक. ४३)अंगणात पाणी शिंपडणे ४४) चंद्राची कला ४५) सावकाश, संथ. ४६) शरम. ४७) जाडसर पीठ. ४९) पुष्कळ, खूप. ५१) जमिनीखाली येणारे फळ, उदा. बटाटा, रताळे, गाजर इ. ५२) गरळ ओकणारा प्राणी. ५३) सूर्योदयाचा काळ, उषा. ५४) त्रासलेला. ५६) यशस्वी. ५८) चणचण, न्यूनता. ६०) कारस्थानी. ६१) व्रत. ६३) झाकणाचे पात्र. ६४) पावसाची झड. ६५) कामदेव. ६८) जीवलग ६९) टेकडी, उतरणे, ढाळ. ७१) रममाण, निमग्न. ७२) प्रॅक्टिस मराठीत. ७५) किमानच्या विरुद्ध ७६) **** **** सोन्याचे कडबुलं, एक बालगीत. ७७) मोठ्या डोळ्यांचे विशेषण.

उभे शब्द : १) द्वेषाची, वैराची भावना. २) दूर करणारा. ३) अंगाची आग. ४) दूध ५) घोंगडी विणणारी जमात. ६) रोखलेली नजर. ७) विरोधी, प्रतिकूल मत, ८) कोकणापट्टीचा दक्षिण भाग. ९) वाटप करणारा. ११) घमघमाट. १४) मेहरबानी. १५) धावांची शंभरी. १७) अनुमती. १९) भुंगा, भ्रमर. २२) दोन आठवड्याचा काळ. २४) पवित्र. २६) मला. २७) खोडण्याचे साधन. २८) वाकलेला. २९) एक सुगंधी वनस्पती. ३०) रक्षणकर्ता, कैवारी. ३२) डोंगराचा उभा भाग. ३४) ढग. ३६) भटक्या लोकांची टोळी, समुदाय. ३७) जगाचे कालचक्र. ४१) अडत्या. ४३) सगळीकडे. ४४) एक औषधी वनस्पती ४५) शनिवार. ४८) रस्ता, सडक, मार्ग. ५०) उत्तीर्ण. ५२) बासरी. ५३) एक फळ. ५५) च्यासाठी. ५७) ढोंगी, अविश्वासू ५९) मादीच्या विरुद्ध ६०) रेशमी धोतर. ६२) आचार्य अत्रेंचे जन्मगाव. ६५) हेतू, कारण, उद्देश. ६६) परमेश्वर. ६७) जीव. ७०) पक्षीराज ७१) लक्ष्मीचे एक नाव. ७३) जंगली, वन्य. ७४) टरफल, वर्ष. ७५) मनाचा ओढा.

शब्दकोड२७७चे उत्तर

प	लं	ग	पो	स	■	■	बा	बा	■	वि	ज	न	वा	स
र	■	म	ट	का	■	अ	व	हे	ल	ना	■	व	■	म
व	च	न	■	ळ	■	व	■	र	वा	■	नि	को	बा	र
चा	ल	■	ज	■	■	शे	ळी	■	ज	पा	■	ट	प	■
■	न	व	ल	वि	शे	ष	■	स	मा	न	■	ना	■	खं
पा	व	■	द	■	त	■	या	न	■	■	क	रा	म	त
क	ल	म	■	ह	क	ना	क	■	धे	■	■	य	म	■
■	न	ज	र	■	री	स	■	ध	नु	ष्य	बा	ण	■	वि
रा	■	ल	व	ण	■	का	सा	र	■	■	ग	■	स	जा
स	हो	द	र	■	दी	■	प	ण	जो	बा	■	ज	ह	र
ग	■	र	व	ळ	ना	थ	■	■	ग	जा	न	न	■	■
र	क	म	■	■	ना	■	द	र	■	र	■	ता	क	द
बा	■	ज	ग	न्ना	थ	■	रा	स	■	ग	वा	■	र	■
■	पा	ल	म	■	■	ता	रा	■	आ	प	प	र	भा	व
मि	त्र	■	जा	ई	जु	ई	■	सां	ज	■	र	■	र	सा